**Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)**
*with* **International Impact Factor 8.357**
**Peer Reviewed Journal**
**https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P041**

**e-ISSN No. 2394-8426**
**Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26**
**Issue–I(I), Volume–XIV**

# भारतीय ज्ञान आणि दलित मुक्ती

**प्रा. मेघश्याम नामदेव ढाकरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विद्या विकास कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
समुद्रपूर, जि. वर्धा.

**सारांश :**
प्राचीन भारताचा विचार केला असता भारतीय ज्ञान प्रणालीतून केवळ धर्माचाच विचार व्यक्त झालेला नसून सामाजिक मूल्य, धर्म, नैतिकता, वेदांचा अभ्यास, आश्रमव्यवस्था, वर्णव्यवस्था, संस्कार, पुरुषार्थ आणि संस्कृती इत्यादीच्या माध्यमातून तसेच वाणिज्य,व्यापार, शिक्षण, वर्ग व्यवस्था समाजाची रचना तयार करण्यात आली होती आणि व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाची घडी बसवण्यात आली होती. भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन ऐतिहासिक दृष्ट्या समृद्ध बहुआयामी आणि अनुभवावर आधारलेली परंपरा असून तिने भारतीय समाजाला बौद्धिकता, नैतिकता, संस्कृती यासारखे देण दिली आहे. परंतु समकालीन समाजाचा विचार करता भारतीय ज्ञानाचे अनेकदा वैज्ञानिक पुराव्या विना अपप्रामाणीकपणे गौरवीकरण केले जाते. दंतकथा, मिथक, श्रद्धा,पुराणकथा, इतिहास व विज्ञान म्हणून मांडण्याची प्रवृत्ती दिसते, त्यामुळे केवळ इतिहासाचे विकृतीकरण होत नाही तर विवेकवाद,वैज्ञानिकता, यासारख्या सामाजिक मूल्यांना तडा जाताना दिसते आणि आपल्या ज्ञान परंपरेने दिलेली मूल्ये लोप पावततांना दिसते.

प्रस्तुत रिसर्च पेपर मध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समीक्षात्मक अभ्यास करता करताना तिच्या दलित, वंचित, उपेक्षित, स्त्री घटकावर झालेला ऐतिहासिक प्रभावाचे दर्शन करण्यात आले आहे. वर्णव्यवस्था, जातव्यवस्था यामुळे झालेले अन्याय आणि विवेक वादाचा आणि मानवता वादाचा विचारांचा उगम यांचा अभ्यास यात झालेला आहे आणि भारतीय ज्ञान प्रणालीची पुनर्रचना आता कशी उपयोगातील याची मांडणी केलेली आहे.

**बीजशब्द :** भारतीय ज्ञान प्रणाली, समकालीन समाज, वैज्ञानिक दृष्टिकोन, अप्रामाणिक गौरवीकरण, इतिहासाचे विकृतीकरण, विवेकवाद, सामाजिक न्याय, दलित मुक्ती, संविधानिक मूल्ये, परंपरा आणि आधुनिकता, विज्ञानविरोधी समजुती, सामाजिक बहिष्कार, डिजिटल अर्काइव्ह, स्थानिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, मूल्यधारित अध्यात्म

## विषयाचा परिचय :

## भारतीय ज्ञान प्रणालीचा दलितांवर परिणाम :

भारतीय ज्ञान प्रणाली हजारो वर्षापासून विकसित होत आली. वेद, उपनिषद, श्रुती -स्मृती, धर्मशास्त्र,पुराण, लोक परंपरा,आयुर्वेद, तर्क,गणित, कला, संस्कृती या सर्वांचा एकत्रित वारसा म्हणजे **IKS**. या ज्ञान प्रणालीने भारतीय समाजाला दिशा दिली परंतु तिच्या सामाजिक रचनेत वर्णव्यवस्था आणि जातीभेदावर आधारित असमानतेची मुळे खोलवर रुजली आहे. त्याचा परिणाम अस्पृश्यांना ज्ञान, शिक्षण,संस्कृती व सामाजिक सत्तेपासून दीर्घकाळ दूर ठेवल्या गेले. ज्यांच्या हातात सत्ता आहे असे उच्चवर्णीय ज्ञान संपादन करु शकत होते कारण भारतीय ज्ञान प्रणालीत जातीनुसार विभाजन झाले होते.

## भारतीय ज्ञान प्रणालीमुळे दलितांवर झालेले परिणाम पुढीलप्रमाणे :

### 1) शिक्षणापासून वंचितता :

भारतीय ज्ञान प्रणालीत जातीनुसार वर्ग व्यवस्था होती वेदपठनाचा अधिकार आणि श्रवणाचा अधिकार उच्च वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्गाचा होता आणि शेवटचा वर्ग म्हणजे शूद्र वर्ग, त्यांना वेदश्रावणावर बंदी होती आणि या नियमांची उल्लंघन केल्यास कठोर शिक्षा होत असे. त्यांना गुरुकुलात प्रवेश नव्हता. दलित इच्छा असतानाही लिखाण वाचन करू शकत नव्हते म्हणजेच शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले होते.

### 2) व्यवसाय आणि सामाजिक स्थिती निश्चित :

जात आधारित सामाजिक व धार्मिक बंदी असूनही काही दलित शिक्षण व श्रम उद्योगाच्या माध्यमातून स्वतःची आर्थिक स्थिती सुधारली पण या माध्यमातूनही सामाजिक पूर्वग्रह, प्रतिष्ठा,जातीबाहेर काढण्याची भीती यांचा सामना करावा लागतो.

पारंपारिक हिंदू वर्णव्यवस्थेत प्रत्येक वर्णाला विशिष्ट व्यवसाय व सामाजिक कर्तव्य दिले गेले होते. या पद्धतीतून व्यवसाय + सामाजिक दर्जा जन्मत: ठरत असे. यामुळे दलित किंवा अस्पृश्य गटांना उच्च दर्जा, प्रतिष्ठा, आर्थिक, सामाजिक अधिकार मिळणे कठीण झाले.

उच्च वर्ग ब्राह्मणांना वेद पठाण श्रवण असे अधिकार होते क्षत्रियांना लढायाचे कार्य होते वैश्य वर्ग व्यापारी वर्ग होता आणि शुद्राचे कामे अतिशय दर्जाची होती जातीने काम ठरवून दिलेली होती. मनुस्मृतीनुसार दलितांची कामे मृतदेह वाहून नेणे चर्मकार,स्वच्छता, खालच्या स्तरावरील श्रम असे होते.

3) **संस्कृती व धार्मिक बहिष्कार :**

भारतीय समाज व्यवस्थेत जातीची उतरंड होती. वर्ण व्यवस्था सामाजिक पातळीवर मर्यादित नव्हती. तर ती सांस्कृतिक आणि धार्मिक बहिष्कारावर आधारित होती. शूद्रांच्या उपस्थितीत ब्राह्मणांनी वेदाचे अध्ययन करू नये, तर त्यांना अयोग्य मानण्यात यावे. वेदाध्ययन करण्यावर शूद्र यांना दंड देण्याच्या संदर्भात म्हणून नंतरचे लेखक तर कित्येक पावले समोर जाऊन ते अधिक कठोर होतात. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिपादन करतात. गौतम धर्मसूत्राचे म्हणणे आहे की जर कोणता शूद्र वेदवाक्य ऐकतो किंवा कोणत्याही शब्दाचे उच्चारण करीत असेल तर राजाने त्याची जीभ दोन भागात कापावी आणि त्याच्या कानात उकळत असलेला गरम शिसा टाकावा.

**भारतीय ज्ञान आणि समकालीन समाज :**

भारतीय ज्ञान प्रणाली ही हजारो वर्षांची तत्त्वज्ञान,विज्ञान, कला, नीतिशास्त्र,अध्यात्म आणि समाज व्यवस्था यांची व्यापक परंपरा आहे. वेद,उपनिषद, सूत्र, पुराणे, श्रमण परंपरा, लोकज्ञान,कृषी व्यवस्था, औषध शास्त्र आणि भारतीय गणित -खगोल यासारख्या विविध शाखांनी भारतीय संस्कृतीची ओळख घडवली.

परंतु समकालीन भारतीय समाजाशी या ज्ञानाचा संबंध द्विपक्षीय, मिश्र,बहुआयामी आहे. एकीकडे आधुनिकता, विज्ञान, लोकशाही, आणि समता या मूल्यांनी समाज बदलत आहे तर दुसरीकडे भारतीय परंपरेतील अनेक घटक आजही विचार आणि संस्कृती रचनेवर परिणाम करतात.

**पारंपारिकता विरुद्ध आधुनिकता संघर्ष :**

पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेल्या प्रथा,रूढी,श्रद्धा, आणि सामाजिक व्यवस्था म्हणजे पारंपरिकता होय. तर आधुनिकता म्हणजे विवेक विज्ञान, मानवधिकार आणि समतेवर आधारित जीवनदृष्टी होय. आधुनिकता ही व्यक्तीवर परिणाम करते तर परंपरा समूहावर परिणाम करते. वैज्ञानिक दृष्टिकोन,मूल्य व्यक्तीस्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्याय, शिक्षण आणि तंत्रज्ञान ही सर्व आधुनिकतेला प्रभावित करणारी घटक आहेत. संघर्षाची प्रमुख क्षेत्र पुढीलप्रमाणे

**अ ) जातिव्यवस्था विरुद्ध सामाजिक समता :**

भारतीय ज्ञान परंपरेनुसार प्रत्येक समाजाचे जातीनिहाय व्यवसाय नियम ठरले असायचे आणि जातीमुळे व्यक्तीचा दर्जा ठरविला जात असे. जातीने जातीने आखून दिलेल्या नियमांच्या आधारे खान - पान, रोटी-बेटी व्यवहार चालायचे.

आधुनिकतेत संविधानिक समानतेला महत्त्व दिले गेले, जसं की संविधानाच्या कलम 17 नुसार अस्पृश्यता बंदी सांगितलेली आहे.

**ब) स्त्रियांची भूमिका :**

परंपरेत स्त्रीची भूमिका घरगुती कामातच होती म्हणजे चूल मुल आणि वाटेल तर केसात माळायला फुल अशी होती. स्त्री जन्माचे सार्थक कुटुंबासाठी राबण्यात आहे असा विचार रूढ होता.

आधुनिकतेत मात्र स्त्री ही समान नागरिक आहे तिचा वडीलाच्या पतीच्या संपत्तीमध्ये हक्क असते, ती शिक्षण घेऊ शकते,स्वतःची निर्णय घेऊ शकते आणि तिला तिच्या विवाहाचे स्वातंत्र्य असते.

**क ) धर्म आणि विज्ञान :**

परंपरेचा विचार केल्यास धर्मश्रद्धेला विशेष स्थान होते. धार्मिक अधिकार फक्त ब्राह्मण जातीला दिल्या गेल्या होते. धर्म जातीव्यवस्थेवर आधारित होता, जात व्यवस्था म्हणजे सामाजिक आर्थिक शैक्षणिक राजकीय नागरी अधिकाराचे स्थायी विषम वितरण होय. डॉ बाबासाहेब यांनी तर धर्माला अनेक प्रकारच्या आज्ञा आणि निषेध म्हटले आहे. तर आधुनिक जगात ज्योतिष्य, वास्तु यांना धर्मासोबत वैज्ञानिकतेची जोड लाभली आहे.

**ड) शिक्षण पद्धती :**

आधीच्या शिक्षण पद्धतीमध्ये गुरुकुल पद्धती आणि पाठांतरावर भर असायचा. मुलगा आठ वर्षाचा झाला की त्याचा उपनयन संस्कार होऊन तो गुरुगृही राहून आपले अध्ययनाचे कार्य करायचा आणि वेदाभ्यास, श्रुती ,उपनिषद यासारख्या गोष्टी शिकायचा.

आता मात्र आधुनिक शिक्षणात विवेक, संशोधन, तंत्रज्ञान वैज्ञानिक दृष्टिकोन यासारख्या गोष्टींची जोड मिळून शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीतील अंतर्गत संघर्ष**

**सामाजिक सुधारक आणि संघर्ष :**

1) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी जातीभेद,त्यातून व्यवसाय, दलितांचा मंदिर प्रवेश त्यांच्या सोबत होणारी हिनतेची ची वागणूक या सर्वांवर टीका करून परंपरावादाला आव्हान देऊन संविधानिक समतेचा पाया रचला.

2) **सावित्रीबाई फुले** यांचा विचार करता जिथे परंपरेने स्त्री शिक्षणाला नाकारले होते तिथे स्त्री फक्त उपभोगाची वस्तू म्हणून बघितल्या जायचे त्या परिस्थितीवर मात करून प्रथम शिक्षिका बनून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

3) **महात्मा ज्योतिबा फुले** यांनी जातिभेदला विरोध करून स्त्री शिक्षणाचा पाया रचला.सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक कार्याचा समानतेचा पुरस्कार केला.

4) **पेरियार** यांनी विवेक वादाचा पाया रचला.

ह्या सर्व समाजसुधारकांनी परंपरेचा विरोध करून आधुनिक मूल्ये समाजात रुजवली. भारतीय समाजातील जातीय धार्मिक लैंगिक आणि सांस्कृतिक अन्यायाला त्यांनी विवेक विज्ञान आणि मानवतावादाच्या आधारे कठोर आव्हाने दिली.

त्याचप्रमाणे **साहित्याच्या** निर्मितीतूनही संत नामदेव, चोखामेळा  सारख्या संतांनी साहित्य निर्माण करून, परंपरेला झुगारून आपल्या वेदना आणि विद्रोहाला साहित्य रूपात अवतरित केले. संत चोखामेळा म्हणतात की

**" ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा । काय भुलासी वरलिया रंगा ॥१॥**
**कमन डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुलासी वरलिया रंगा ॥२॥**
**नदी डोंगी परी जळ डोंगें । काय भुलासी वरलिया रंगें ॥३॥**
**चोखा डोंगा परी भाव डोंगा । काय भुलासी वरलिया रंगा ॥४॥"**

**समकालीन समाजातील संघर्षाची रूपे :** पूर्वीच्या काळाचा विचार केला असता आजही संघर्ष विविध स्वरूपात दिसतो.

1) **मंदिर प्रवेश :** धार्मिक हक्क कुठल्या एका समूहाच्या हातात एकवटलेला असतो. मंदिरामध्ये आजही काही समूहाला प्रवेश नसतो.

2) **आंतरजातीय विवाह :** आज जातीपासून मुक्त होण्यासाठी दुसरा कोणताही उपाय उपयुक्त ठरत नाही परंतु लोक सहजपणे आंतरजातीय विवाह करण्यास तयार होत नाही. आंतरजातीय विवाह हाच जाती निर्मूलनाचा एक महत्त्वाचा उपाय आहे .परंतु जातीची कल्पनाही धार्मिक असते.

3) **लैंगिक समानता:** आधुनिक बदल झाले असले तरी आपली संस्कृती पुरुषप्रधान असल्यामुळे स्थितीप्रियता ही अडचण आजही काही ठिकाणी येत असते आणि त्यामुळे स्त्रियांना समान वागणूक दिल्या जात नाही.

4) **समलैंगिक हक्क:** आधुनिकतेने जरी आपल्या विचारांमध्ये प्रवेश केला असला तरी सर्वांना सारखे हक्क अजूनही मिळाले नाही. त्यात स्त्री- पुरुष आणि इतर श्रेणी असा भेद होतोच.

5) **डिजिटल तंत्रज्ञान विरुद्ध पारंपारिक जीवनशैली :** डिजिटल तंत्र ज्ञानाने मानवी जीवनावर अनेक अमुलाग्र आणि क्रांतिकारी परिणाम घडवून आणले असले तरी मात्र या क्रांतिकारी बदलामुळे पारंपरिक जीवनशैली अनेक मूल्ये, सवयी,आणि नातेसंबंधावर प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याचे दिसून येते. डिजिटल तंत्रज्ञान जीवन सुलभ करते परंतु पारंपारिक जीवनशैली जीवनाला अर्थ देते.

**संघर्षातून समन्वयाकडे :**

परंपरा की आधुनिकता, आधी प्राधान्य कोणाला ? परंतु आधुनिकतेची कास धरूनच परंपरेचे मूल्यांकन केल्या जात आहे आणि समन्वयाच्या दिशेने पाऊल टाकल्या जात आहे.

**1) मानवतावादी परंपरा स्वीकारणे :** ज्या परंपरा विवेकशील आहेत तिथे मानवतेचा विचार केला जातो जसे की 'अहिंसा', 'वसुदेव कुटुंबकम' अशा परंपरांचा स्वीकार केला पाहिजे.

**2) अन्यकारक प्रथा नाकारणे :** आधुनिकतेची कास धरताना संघर्षातून समन्वयाकडे जात असताना अन्यायकारक प्रथा जसे की सती प्रथा, केशवपण यासारख्या प्रथा  नाकाराव्या लागतील.

**3) वैज्ञानिक दृष्टिकोनासोबत संस्कृतीची ओळख जपणे :** आधुनिकतेचा पुरस्कार केला म्हणून भारतीय ज्ञान प्रणालीतील संपूर्ण परंपरांना झुगारून चालणार नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनासोबत संस्कृतीची ओळख जपावी लागेल.

**4) संविधानिक मूल्यांना सर्वोच्च स्थान :** आधुनिकता विरुद्ध परंपरा या संघर्षातून समन्वय साधताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात जी मूल्य दिली आहेत त्यांना सर्वोच्च स्थान असायला पाहिजे.

अशाप्रकारे संघर्ष हा प्रतीकात्मक जरी असला तरी मात्र समाज परिवर्तनाची प्रेरणा आहे. परंपरा समाजाला ओळखते ते तर आधुनिकता समाजाला दिशा देते.

**भारतीय ज्ञान आणि समकालीन बदलती परिस्थिती :**

भारतीय ज्ञान परंपरा ही अगदी प्राचीन परंपरा असून तिचे ज्ञान, विज्ञान,कला, तत्त्वज्ञान, समाज व्यवस्था, नैतिकता, स्वास्थ, अध्यात्मिकता अशा क्षेत्रात अमूल्य योगदान दिले आहे. परंतु समकालीन समाजात जीवनशैलीत, तंत्रज्ञानात झपाट्याने बदल होत आहे. बदलत्या परिस्थितीत भारतीय ज्ञानाचे स्वरूप, भूमिका आणि उपयोगिता पुन्हा प्रेरक ठरत आहे.

**1) जागतिकीकरण :**

आज जागतिकीकरणामुळे समाजात वेगाने बदल होत आहे. मुक्त व्यापार, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक,जागतिक बाजारपेठ,रोजगार निर्मिती,सेवा क्षेत्रांचा विकास यासारख्या परिवर्तनामुळे वेगाने बदल होत आहे.

**2)शहरीकरण:**

औद्योगीकरणामुळे शहरांची लोकसंख्या वाढली आहे आणि उद्योग, रोजगार, शिक्षण,आरोग्य, वाहतूक आणि आधुनिक सुविधा यामुळे शहरीकरणाला गती मिळाली आहे.

**3) डिजिटल क्रांती :**

डिजिटल क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे जग अगदी जवळ आले आहे. त्याचप्रमाणे वैज्ञानिक प्रगती,तांत्रिक प्रगती, लोकशाही व संविधानिक मूल्ये, सामाजिक न्यायासाठी झालेल्या चळवळी या पार्श्वभूमीवर भारतीय ज्ञान परंपरेचे पुनर्मूल्यांकन आवश्यक ठरले.

**शिक्षण आणि भारतीय ज्ञानाचे बदलते स्वरूप**

आज भारतीय ज्ञान प्रणाली शिक्षणात नव्याने प्रवेशित होत आहे, जसे की IKS (Indian Knowledge System) सर्वत्र दिसत आहे. तसेच नवीन अभ्यासक्रमांचा विचार केल्यास बहुविषयक शिक्षण तर्क संशोधन आणि प्रयोग यावर आधारित आहे. तसेच फिल्ड प्रोजेक्ट सारख्या विषयाने तर लोकज्ञानाला समावेशीत करण्याचा चांगला प्रयत्न आहे. गुरुकुल पद्धती विचारात घेऊन विवेकाधारित,वैज्ञानिक आणि सर्व समावेशक शिक्षण पुढे येत आहे.

**विज्ञान तंत्रज्ञान आणि भारतीय ज्ञान**

**पारंपारिक ज्ञानाचे आधुनिकीकरण :**

भारतीय ज्ञान परंपरेत असणारे जे पारंपारिक ज्ञान आहे त्यांचे आधुनिकीकरण झाले आहे.जसे आयुर्वेदाच्या आधारावर जैविक संशोधन, योगाच्या आधारावर न्यूरो सायंस गणिताच्या आधारावर संगणक विज्ञान आणि कृषिज्ञानाचा आधारावर शाश्वत विकास.

**डिजिटल युगातील ज्ञान :**

डिजिटल हस्तलिखित AI आधारित संस्कृत ग्रंथाचे भाषांतर,ऑनलाईन योग, संगीत, शिक्षण, पॉडकास्ट, ऑडिओ बुक यासारख्या अनेक माध्यमातून भारतीय ज्ञान जागतिक पातळीवर पोहोचत आहे.

**समाज रचना आणि सामाजिक न्याय:**

समकालीन समाजात संविधानिक समानता मानव अधिकार,आरक्षण, स्त्री-दलित- आदिवासी सशक्तिकरण या मूल्यांनी पारंपारिक असमानतांना आवाहन दिले आहे. त्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार या परिवर्तनाचे केंद्रबिंदू ठरले आहे.

**अध्यात्मय आणि आधुनिक जीवन:**

आज धर्माची भूमिका बदलत आहे कर्मकांडातून मूल्याधारीत अध्यात्माकडे क्रमिष्ठ होत आहे.संकुचित धर्मभावनातून मानवतावादी दृष्टिकोनाकडे वळत आहे.ध्यान,योग,नैतिकता यांना आधुनिक जीवनशैलीतील नवीन स्थान मिळत आहे.

**कला साहित्य आणि सांस्कृतिक बदल** :

भारतीय कला व साहित्य,डिजिटल माध्यमातून विकसित होत आहे.सामाजिक प्रश्नांवर भाष्य केल्या जात आहे,दलित स्त्रीमुक्तीचा प्रश्न,दलित साहित्य,पर्यावरणीय साहित्य अशा साहित्याचा उदय होत आहे. कला ही परंपरेची वाहक आणि बदलाची प्रेरक बनली आहे.

भारतीय ज्ञान परंपरा आणि समकालीन बदलत्या परिस्थितीमुळे जागतिक संवादाच्या संधी मिळत आहे. सर्वसमावेशकतेचे पुनर्मूल्यांकन होत आहे आणि शाश्वत विकासासाठी भारतीय ज्ञान पावलो पावली उपयुक्त ठरणारे वाटते.

**भारतीय ज्ञान आणि समकालीन समाज समस्या आणि उपाय :**

भारतीय ज्ञान प्रणाली ही जीवनाभिमुख परंपरा आहे त्यातून समन्वय साधून चांगली मूल्ये तंत्रज्ञान आत्मसात करता येतात परंतु समाजात झालेल्या वेगवान बद्दल तंत्रज्ञान जागतिकीकरण आणि सामाजिक संघर्षामुळे भारतीय ज्ञानासमोर अनेक समस्या उभ्या ठाकल्या आहेत त्या समस्या आणि त्यावर उपाय पुढील प्रमाणे -

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P041
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

**जातीय व सामाजिक असमानता:**

**समस्या :**

जन्माने जात मिळते आणि जातीने दर्जा मिळतो.जातीय वादाला श्री नारायण गुरु समाज सुधारक म्हणतात की जातीयवाद ही मुळात अज्ञानामुळे उद्भवलेली एक वाईट घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जात म्हणजे विविध, सामाजिक,आर्थिक राजकीय व नागरी सत्ता आणि अधिकारांचे स्थायी, विषम वितरण होय. ते म्हणतात की जात हा शब्द समान दर्जाचा नाही जात ही असमानतेवर आधारित आहे जातीभेदामुळे उच्च नीच भेदभाव वाढतात जातीमुळे परंपरागत व्यवसाय किंवा कामे करावी लागल्यामुळे त्याच्या श्रमाच्या आनंद घेता येत नाही. कारण जातीने व्यवसाय लादल्या जाते. तसेच सामाजिक बहिष्कार यामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात. जातिभेद वर्णभेदामुळे दलितांना समाजाबाहेर ठेवले जाते. त्यांच्या करवी हीनतेची कामे केली जातात त्यांच्यावर अन्याय केला जातो. समाजाचा भाग असूनही समाजाबाहेर ढकलल्या जाणे म्हणजे सामाजिक बहिष्कार होय ह्यात अस्पृश्यता पाळणे, मंदिर प्रवेश नाकारणे, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे स्त्रियांवर निर्बंध, सतीप्रथा, केशवपण, विधवा पुनर्विवाह यासारख्या प्रथा मोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर बहिष्कार घातला जायचा व त्या व्यक्तीचे जीवन मग तिथे संपून जायचे तसेच दलित स्त्रिया आदिवासींवर अन्याय यासारख्या केवळ अशिक्षित स्त्रियांनाच नव्हे तर सुशिक्षित दलित स्त्रियांना देखील शारीरिक आणि मानसिक रित्या छळले जाते. त्यात दलित स्त्रियांना आदिवासींना शिव्या देणे, मारणे,त्यांच्या समक्ष मुलींची अब्रू लुटणे किंवा ठार मारणे इत्यादी अमाणूश प्रकार घडतात ,यावर उपाय पुढीलप्रमाणे सांगता येईल .

**उपाय :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये नमूद केलेली मूलभूत तत्वे जसे न्याय स्वातंत्र, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही यासारख्या मूल्यांचे अंमलबजावणी व्हायला पाहिजे त्याचा परिणाम सामाजिक विषमता कमी करणे, मानवी अधिकारांचे रक्षण होईल, लोकशाहीचे बळकटीकरण होईल, राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार होईल आणि दुर्बल घटकांचे सक्षमीकरण होईल. आंबेडकरवादी तसेच समाजसुधारक जसे की महात्मा बसवेश्वर, नारायण गुरु, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा प्रसार व्हायला पाहिजे व सर्वसामावेशक भारतीय ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन व्हायला पाहिजे.

**स्त्रीविषयक असामानता :**

**समस्या :**

भारतीय संस्कृतीही पितृसत्ताक संस्कृती आहे. पुरुषप्रधानता नुसता शब्द नसून एक संकल्पना आहे .यात स्त्रियांच्या लैंगिकतेवर उत्पादन क्षमतेवर बंधने असते, तिच्या संचार स्वातंत्र्यावर बंधन असते, वडिलांनंतर मालकी हक्क मुलांचाच असतो ,त्यांना शिक्षणा च्या संधीमध्ये सुरक्षा, समान हक्क मिळत नाही. तसेच त्यांच्यावर धार्मिक, सांस्कृतिक बंधने असतात.

**उपाय :**

स्त्री शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरण झाले पाहिजे, त्यांना प्राधान्यता दिली पाहिजे ,लिंग समतेवर आधारित पुनर्वाचन झाले पाहिजे, स्त्रीवाद भारतीय विचारांचा स्वीकार झाला पाहिजे स्त्रीमुक्तीचा विचार मांडताना स्त्रियांचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेचा नेमकेपणाने विचार करावा लागेल.

**संशोधन पद्धती:**

हे संशोधन गुणात्मक आणि विश्लेषणात्मक आहे .भारतीय ज्ञान प्रणाली समकालीन गौरवीकरण त्याचा दलितांवर होणारा परिणाम त्यातून उद्भवणाऱ्या समस्या आणि उपाय याचा समीक्षात्मक अभ्यास करण्यावर भर दिला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) भारतीय ज्ञान प्रणालीची ऐतिहासिक आणि तत्वज्ञानात्मक रचना समजून घेणे.
2) वैज्ञानिक पुराव्या विना केलेल्या दाव्यांचे विश्लेषण करणे.
3) इतिहासाचे विकृतीकरण आणि त्याचे सामाजिक परिणाम तपासणे.
4)दलित व वंचित समाजांवर ज्ञानपरंपरेचा प्रभाव अभ्यासणे
5)संविधानिक मूल्ये आणि विवेकवादाच्या संदर्भात भारतीय ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन करणे.

**डेटा संकलन पद्धती:** शास्त्रीय पुस्तके संविधान आणि शासकीय दस्तऐवज.

**नमुना निवड:** समकालीन समाजाचा प्रभाव टाकणारे ग्रंथ, लेखक, विचारप्रवाह व चळवळी.

**डेटा विश्लेषण :** सामग्री विश्लेषण, तुलनात्मक अभ्यास, सामाजिक परिणामांचे विश्लेषण.

**चर्चा:** वरील संशोधनावरून भारतीय ज्ञान प्रणालीचे भवितव्य हे परंपरा विरुद्ध आधुनिक संघर्षात नसून विवेकशील समन्वयात आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन ,मूल्य आधारित दृष्टिकोन ,तर्क यांच्या समन्वयात आहे. हा समन्वय स्वीकारल्यास भारतीय ज्ञान समकालीन समाजासाठी अर्थपूर्ण ठरू शकते.

**निष्कर्ष :** या संशोधनाच्या अंती असा निष्कर्ष मांडण्यात येईल की भारतीय ज्ञानाचे खरे सामर्थ्य अंध गौरविकरण नव्हे तर वैज्ञानिक विवेकशील समतावादी, मानवतावादी दृष्टिकोनात आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले, पेरियार ,दलित संत साहित्य, दलित लेखन यातून मांडलेला विवेकवाद समकालीन समाजाला दिशादर्शक ठरते. परंपरा,आधुनिकता, श्रद्धा आणि तर्क अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधून संविधानिक मूल्यांच्या आधारे भारतीय ज्ञानाचा पुनर्विचार केल्यास नक्कीच ते सामाजिक परिवर्तन आणि मुक्तीचे प्रभावी साधन ठरू शकेल.

**संदर्भ ग्रंथ सूची (APL शैली):**

1) Ambedkar B. R. (1979) Anhilation of caste. Mumbai India : Government of maharashtra.
2) Borkar Nalini : (2018) Indian Knowledge System: social Reformers, Issues and Movements. Sainath publication Nagpur.
3) Aglave Pradip and Aglave Saroj : (2017) Foundation Of Sociological Thought ( western and Indian) Sainath publication Nagpur
4) Kamble Sanjaykumar : (2016) Dalit striyancha mukticha prashn Daimond publication Pune.
5) Phalke Bhalchandra:(2020) Dalit Sahitya Vedna Ani Vidroh Shrividya publication Pune.